देशाला २०२५ सालापर्यंत क्षयमुक्त करण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून १८ वर्षांवरील सर्व व्यक्तींना क्षयरोगाची लस देण्याची मोहीम राज्यात राबवण्यात येईल, अशी माहिती आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी विधानसभेत दिली. याबाबतचा प्रश्न विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला होता.

छत्रपती शिवाजी महाराजांनी वापरलेली वाघनखं येत्या १९ जुलै पासून साताऱ्यातल्या सरकारी संग्रहालयात ठेवली जातील, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज विधानसभेत दिली.

राज्य सरकारने मुस्लिमांना आरक्षण द्यावं, अशी मागणी आमदार अबू आझमी यांनी आज विधानसभेत केली. यावर संविधानात धर्मावर आधारित आरक्षणाची तरतूद नाही, त्यामुळं मुस्लिमांमधल्या मागास जातींना आरक्षण दिली असल्याची प्रतिक्रिया कॅबिनेट मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

**<><><><><>**

मुंबईच्या परळ भागातल्या बी. आय. टी. चाळीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं भव्य स्मारक उभारण्यासाठी सरकारची भूमिका सकारात्मक आहे, अशी ग्वाही मंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत दिली. या चाळीत अद्याप काही लोक राहत असून त्यांचं पुनर्वसन झाल्यावर स्मारकाचं काम पुढे नेण्यात येईल, असंही त्यांनी नमूद केलं.

इंदू मिल परिसरातही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं स्मारक उभारण्याचं काम वेगानं सुरू आहे. त्यांचा भव्य पुतळा उभारण्यास लागणारा वेळ सोडता उर्वरित काम पुढच्या वर्षी पूर्ण होईल, असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला दिलं.

पुण्याच्या कल्याणीनगर भागात मे महिन्यात झालेल्या पोर्श कार अपघात प्रकरणाच्या तपासात पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी अतिशय

तत्परतेनं काम केलं आहे, यात कुठेही निष्काळजीपणा झालेला नाही, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत स्पष्ट केलं.

राज्यात अंमली पदार्थ विरोधी मोहिमेअंतर्गत या वर्षी मे महिन्यापर्यंत ६ हजार ५२९ कारवाया करण्यात आल्या असून यात ४ हजार १३१ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत दिली.

**<><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करणार आहेत. आपल्या मुंबई दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी उद्या ते नरसी मोनजी मॅनेजमेन्ट स्टडीज संस्थेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत देशातल्या नामांकित अर्थतज्ज्ञांशी संवाद साधला आणि आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाबाबतची त्यांची मतं आणि सूचना जाणून घेतल्या. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, नीती आयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी आणि इतर सदस्य या बैठकीला उपस्थित होते .

**<><><><>**

पंधराव्या कृषी नेतृत्व समिती २०२४ चा सर्वोत्कृष्ट कृषी राज्याचा पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी काल नवी दिल्लीत स्वीकारला. केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पीक विमा योजनेत महाराष्ट्र अग्रेसर असल्याचं सांगत सिंचन प्रकल्पाद्वारे १७ लाख हेक्टर सिंचन क्षमतेचं ध्येय निश्चित केल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><>**

धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता प्रकल्पाचा तिसरा टप्पा आज सकाळी सात वाजल्यापासून खुला झाला. सोमवार ते शुक्रवार सकाळी सात ते रात्री अकरा या वेळेत हा टप्पा वाहतुकीसाठी खुला राहील. प्रकल्पातल्या उर्वरित कामांच्या पूर्ततेसाठी तो शनिवारी आणि रविवारी बंद राहील.

<><><><><>

नीट यूजी परीक्षा पेपर फुटी प्रकरणी आतापर्यंत झालेल्या तपासाचा अहवाल आज सीबीआयनं सील बंद लिफाफ्यात न्यायालयासमोर सादर केला. सर्वोच्च न्यायालयानं सीबीआयला आतापर्यंत झालेल्या तपासाची माहिती देण्याची सूचना ८ जुलै रोजी दिली होती. या प्रकरणाची पुढील सुनावणी सर्वोच्च न्यायालयात १८ जुलै रोजी होणार आहे.

<><><><><>

विम्बल्डन टेनिसमध्ये महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत आज पहिला सामना इटलीच्या जास्मिन पाओलिनी आणि क्रोएशियाच्या डोना वेकिस यांच्यामध्ये तर दुसरा सामना कझाकस्तानच्या एलेना रिबाकिना आणि झेक रिपब्लिकच्या बार्बोरा क्रेझिकोवा यांच्यामध्ये होणार आहे.

<><><><><>

ज्येष्ठ क्रीडापत्रकार सुहास जोशी, खेळाडू विजया नर आणि विलास दळवी यांना पॉवरलिफ्टिंग असोसिएशननं नुकतंच जीवन गौरव पुरस्कारानं सन्मानित केलं. विलास दळवी यांनी राष्ट्रीय स्पर्धेत अनेकदा पॉवरलिफ्टिंग खेळामध्ये पुरस्कार मिळवले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या सेवानिवृत्त कक्ष अधिकारी आणि शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या विजया नर यांनीही पॉवरलिफ्टिंग खेळात आंतरराष्ट्रीय पदकं मिळवली आहेत. क्रीडा पत्रकारितेसाठी हा पुरस्कार प्रथमच देण्यात आला आहे.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

११ जुलै २०२४ - गुरुवार

**//<><><><><>//**